सबसे ‘तेज’ ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २२५ | शुक्रवार, दि. ०८ मे २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

## आजचे अभीष्टचिंतन



**श्री. उमेश धनराळे**
पत्रकार, अमळनेर



**श्री. सुरेश पाटील**
उद्योगपती



**श्री. पांडुरंग महाजन**
माजी उपनगराध्यक्ष, अमळनेर



**श्री. दत्तात्रय निकम**
पोलीस निरीक्षक

# डिजिटली दिव्यदर्शनाची अनुभूती देणारी ‘व्हीआर’ यंत्रणा कार्यान्वित करणारे श्री मंगळग्रह मंदिर देशात एकमेव

## आमदार अनिलदादा पाटील यांच्या हस्ते उद्घाटन; तंत्रज्ञानाधारित धार्मिक पर्यटनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल



*अमळनेर : मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे श्री मंगळग्रह मंदिरासाठी संपूर्ण आभासी दिव्यदर्शन अनुभव देणाऱ्या व्हर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) प्रकल्पाचे विधिवत उद्घाटन करताना आमदार अनिलदादा पाटील. शेजारी अनिल शिसोदे, एल. टी. पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, सचिव एस. बी. बाविस्कर, मंगल सेवेकरी सौ. आशाताई महाले, मंदिराचे पुरोहित यश जोशी, अक्षय जोशी यांच्यासह सेवेकरी व भाविक.* **(छायाचित्रे : नितेश बारी)**

### मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांमध्ये ध्वनी मार्गदर्शनाची सुविधा

*या डिजिटल भ्रमंतीमध्ये मार्गदर्शित आणि स्वयंसंचलित असे दोन्ही पर्याय उपलब्ध आहेत. मराठी, हिंदी आणि इंग्रजी या भाषांमध्ये ध्वनी मार्गदर्शनाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. त्यामुळे पर्यटकांना प्रवासाचे उत्तम नियोजन करता येणार आहे. वृद्ध भाविक, दिव्यांग नागरिक तसेच परदेशात राहणाऱ्या भारतीयांनाही मंदिराचा अनुभव सहजपणे घेता येणार आहे. अचूक माहिती, बहुभाषिक उपलब्धता आणि आभासी अनुभव जगभरातील पर्यटकांना उपलब्ध करून देत अशा प्रकारची व्यासपीठे पर्यटन आणि धार्मिक स्थळांच्या प्रसारासाठी प्रभावी माध्यम ठरू शकतात, असा विश्वास हा प्रकल्प विकसित करणाऱ्या कंपनीच्या संबंधित अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. दरम्यान, याच यंत्रणेच्या सहाय्याने मंदिरात मोठ्या संख्येने येणारे भाविक, पर्यटक व त्यांची वाहने यांचेही सुनियोजन करता येणार आहे.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

**अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे श्री मंगळग्रह मंदिराच्या संपूर्ण आभासी दिव्यदर्शनाची अनुभूती देणारा व्हर्च्युअल रिॲलिटी (व्हीआर) प्रकल्प सुरू करण्यात आला आहे. बुधवार, दि. ६ मे रोजी आमदार अनिलदादा पाटील यांच्या शुभ हस्ते विधिवत पूजा करून या उपक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. ही यंत्रणा देशात सर्वप्रथम श्री मंगळग्रह मंदिरात कार्यान्वित झाली आहे हे विशेष!**

मार्च महिन्यात केंद्रीय कृषिमंत्री नामदार शिवराजसिंह चौहान यांच्या शुभ हस्ते मंदिरात ‘एआय’ यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती. त्या निमित्ताने श्री मंगळग्रह मंदिर देशातील पहिलेच एआय मंदिर ठरले आहे ही बाबही या निमित्ताने अधोरेखित होते. त्यामुळे आता जगभरातील भाविक व पर्यटकांना श्री मंगळग्रह मंदिरासंदर्भातील डिजिटल अनुभव व समग्र माहिती घरबसल्या घेता येणार आहे. तंत्रज्ञानाधारित धार्मिक पर्यटनाच्या दिशेने हे अतिशय महत्त्वपूर्ण पाऊल मानले जात आहे. डांगरीचे माजी सरपंच अनिल शिसोदे, कामगार नेते एल. टी. नाना पाटील, मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले, उपाध्यक्ष एस. एन.




पाटील, सचिव एस. बी. बाविस्कर, खजिनदार गिरीश कुलकर्णी, मंगल सेवेकरी विनोद कदम, प्रकाश मेखा, सौ. आशाताई महाले, ‘ग्लोबल महातेज’चे कार्यकारी संपादक भरत पाटील, ब्युरो चीफ रजनीकांत पाटील, आर्टिस्ट समीर सांगळे, विशाल पाटील यांच्यासह मंदिराचे सेवेकरी व भाविक मोठ्या संख्येने यावेळी उपस्थित होते.

मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे विकसित करण्यात आलेल्या या अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणीत यंत्रणेच्या माध्यमातून भाविक आणि पर्यटकांना श्री मंगळग्रह मंदिर परिसराचा संपूर्ण आभासी फेरफटका मारता येणार आहे. मंदिरातील विविध देवतांची स्थाने, पूजाविधींची स्थळे, गाभारा आणि परिसर ३६० अंशांमध्ये पाहता येणार आहे. घरबसल्या दूरस्थ दर्शनाचा अनुभव घेता येणार आहे. मंदिर परिसरात बसविण्यात आलेल्या परस्परसंवादी स्पर्शपटल केंद्राद्वारे तसेच मोबाईल किंवा संगणकावर कोणतेही ॲप डाऊनलोड न करता ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. मोबाईलच्या सहाय्याने सदर यंत्रणेच्या लिंकचे व्यापक प्रमाणात व्हायरलिंग करण्यात येत आहे.

हा प्रकल्प ‘इम्पॅक्ट सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड’ या मुंबई, कोची आणि दिल्ली येथे कार्यालये असलेल्या तंत्रज्ञान कंपनीने विकसित केला आहे. डिजिटल प्रतिरूप (डिजिटल ट्विन) तंत्रज्ञान, जीआयएस नकाशांकन, कृत्रिम बुद्धिमत्ता विश्लेषण, नगररचना आणि अनुभवात्मक पर्यटन उपाययोजना या क्षेत्रात कार्यरत असलेल्या या कंपनीने ड्रोन फोटोग्रॅमेट्री, ३६० अंशीय स्कॅनर आणि प्रगत त्रिमितीय रेंडरिंग तंत्रज्ञानाच्या सहाय्याने मंदिर आणि परिसराची सविस्तर डिजिटल प्रतिकृती तयार केली आहे. या प्रकल्पाच्या कार्यसंघामध्ये चेन्नई येथील मिथुन आनंद, मुंबई येथील दीप्तीताई पाटील, वंश चिंदा आणि पुष्कर पुष्प यांचा मुख्यत्वे समावेश आहे.

# शेतकरी पॅनलच्या माध्यमातून काँग्रेस मैदानात

**शेतकी संघ निवडणुक**



*अमळनेर : तालुका काँग्रेस कमिटीच्या बैठकीत तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, माजी पंचायत समिती सभापती धनगरदादा पाटील, किसान काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुरेश पीरण पाटील, अमळनेर मार्केट कमिटी संचालक प्रा. सुभाष पाटील, माजी तालुकाध्यक्ष गोकुळ पाटील, प्रा. शाम पवार आदी उपस्थित होते.*

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुका काँग्रेस कमिटीची बैठक दि. ६ मे २०२६ रोजी सायंकाळी अमळनेर टाऊन हॉल येथे संपन्न झाली. बैठकीचा विषय अमळनेर तालुका शेतकरी सहकारी संघाची निवडणूक हा होता. निवडणूक प्रक्रियेनुसार ५ मे रोजी अर्जांची छाननी झाली असून बहुतांश नामांकन अर्ज वैध ठरले आहेत. मतदारसंघनिहाय यादीदेखील जाहीर करण्यात आली आहे.या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षातर्फे शेतकी संघ निवडणूक लढविण्यास इच्छुक उमेदवारांनाच बैठकीसाठी निमंत्रित करण्यात आले होते. बैठकीला सुमारे ३० ते ३५ नामांकन अर्ज दाखल केलेल्या इच्छुकांची उपस्थिती होती.

बैठकीत सुकाणू समितीची नियुक्ती करण्यात आली. त्यात तालुका काँग्रेस कमिटी अध्यक्ष बी. के. सूर्यवंशी, माजी पंचायत समिती सभापती धनगरदादा पाटील, किसान काँग्रेस जिल्हाध्यक्ष सुरेश पीरण पाटील, अमळनेर मार्केट कमिटी संचालक प्रा. सुभाष पाटील, माजी तालुकाध्यक्ष गोकुळ पाटील तसेच समन्वयक म्हणून प्रा. शाम पवार यांचा सर्वानुमते समावेश करण्यात आला.

सर्वप्रथम उमेदवारी का करावी, याविषयी संदीप सैंदाणे, दिनेश पाटील, शहराध्यक्ष गजेंद्र साळुंखे, तुकाराम चौधरी, बन्सीलाल भागवत, गोकुळ पाटील आणि सौ. गीतांजली घोरपडे यांनी आपले विचार मांडले. त्यानंतर प्रा. सुभाष पाटील, सुरेशदादा पाटील, धनगर अण्णा पाटील, विनोद राजधर पाटील आणि भागवत सूर्यवंशी यांनी निवडणुकीतील

पान २ वर

# ‘एमपीएससी’मार्फत भरली जाणार तलाठी पदे

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : राज्यातील स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (एमपीएससी) मार्फत लवकरच तलाठी भरती प्रक्रिया सुरू होणार आहे. यासाठी शासन स्तरावर जोरदार हालचाली सुरू झाल्या आहेत.

गेल्या काही महिन्यांपासून प्रलंबित असलेली तलाठी पदाची भरती आता मार्गी लागण्याची चिन्हे दिसत आहेत. महसूल विभागाकडून १७०० हून अधिक तलाठी पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यासाठी जिल्हानिहाय रिक्त पदांचा अहवाल तयार केला जात असून, त्यानंतर प्रत्यक्ष भरती प्रक्रिया राबविली जाणार आहे. या भरतीमध्ये राज्यातील सुमारे ३३ विभागांतील ११० आस्थापनांमध्ये एकूण ३६०० हून अधिक संवर्गांचा समावेश आहे. सरळसेवा भरतीसाठी १४०० पेक्षा जास्त सेवाप्रवेश नियम लागू आहेत. पूर्वी विविध विभागांकडून स्वतंत्रपणे परीक्षा घेतल्या जात होत्या. मात्र, या परीक्षा खासगी संस्थांकडून घेतल्या जात असल्याने गैरप्रकारांच्या तक्रारी होत होत्या. त्यामुळे पारदर्शकता वाढविण्यासाठी सरळसेवा भरती ‘एमपीएससी’कडे सोपविण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला.

**गर्व से कहो स्वदेशी है हम...!**
**स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!**

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

**जय भारत...!**

**जय स्वदेशी...!!**

## दिनविशेष
८ मे

- क्रांतिकारक वासुदेव चाफेकर यांना फाशी देण्यात आली.
- पं. विष्णू दिगंबर पलुस्कर यांचे शिष्य पं. विनायकराव पटवर्धन यांनी पुण्यात गांधर्व महाविद्यालय सुरू केले.
- महात्मा गांधींनी ब्रिटीश राजवटीविरुद्ध २१ दिवसांचे उपोषण सुरू केले.


## आतील पानात

- ६७ हजार हेक्टरवर पेरणी होणार ...पान २ वर
- इकलौता जिला जहां १७ नदियां हैं
- शिंग्रोबा धनगर कोण होते? ...पान ३ वर

# सत्ताधाऱ्यांनी दोन दिवसाआड पाणी देण्याचे आश्वासन ठरले फोल

## पाणी प्रश्नावरून आमदार अनिलदादा पाटील आक्रमक; आंदोलनाचा इशारा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



अमळनेर : जनतेच्या जीवावर नगरपालिकेत सत्ता मिळवून दोन दिवसाआड पाणी देण्याचे माजी आमदारांचे आश्वासन फोल ठरले आहे. याउलट अनेक वर्षानंतर यंदाच्या उन्हाळ्यात प्रथमच जनता पाण्यासाठी व्याकुळ झाली असताना मात्र पालिकेतील सत्ताधाऱ्याना सोयरसुतक नाही, गेल्या दीड महिन्यापासून शहरभर पाण्याची बोंब झाली असल्याचा आरोप माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा पाटील यांनी केला आहे.

अमळनेरची जनता नियमितपणे पाणी पट्टी कर भरत आहे. जनतेला मूलभूत सुविधा देणे पालिकेचे कर्तव्य आहे. त्यातल्या त्यात उन्हाळा लागला आहे. दहा दहा दिवस प्यायला पाणी मिळत नाही. सर्वसामान्य जनतेला पाण्यासाठी इकडे तिकडे धाव घ्यावी लागत आहे. पाण्याचे नियोजन पूर्णपणे कोलमडले आहे. टाक्या पुरेशा भरल्या जात नाहीत. दहा दिवसाआड देखील कमी दाबाने पाणी पुरवठा होतो. माजी आमदारासह पालिकेतील सत्ताधार्यांनी आपण जनतेचे देणे लागतो. त्यांचा कर वसूल करतो तर पुरेसे पाणी दिले पाहिजे याचे भान ठेवावे.

जळोद डोहातील पाणी आटले तर गंगापुरी डोहातून पाणी आणण्याचा आटापिटा चालवला जात आहे. त्यासाठी देखील खर्च येतो मग आवर्तन का घेतले जात नाही. आवर्तनसाठी ४० लाख रुपये गेले तर जाऊ द्या! तो जनतेचाच पैसा आहे त्यांना पाणी मिळू द्या. एक काम कमी करा पण पाणी द्या. पालिकेची सत्ता बदलताच नियोजन ढेपाळले काही नगरसेवक आपल्याकडे पाणी जास्त सोडून घेतात.त्यासाठी पाणी पुरवठा कर्मचाऱ्यांवर दबाव आणत असल्याच्या तक्रारी माझ्याकडे आल्या आहेत.

सुरळीत पाणी पूरवठाबाबत जर त्वरित निर्णय न घेतल्यास शहर विकास आघाडी आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) तीव्र आंदोलन करेल याची नोंद घ्यावी.

अनेक वर्षांची धार्मिक व भावनिक परंपरा असलेल्या बोरी पात्रातील यात्रोत्सवात यांनी प्रथमच ठेकेदारी व वसुलीचा प्रयोग केल्याने बाहेरगावाहून आलेले विक्रेते व पाळणेवाले नाराज होऊन संपुर्ण यात्रेचे नियोजन कोलमडले आहे. जनतेने मोठ्या अपेक्षेने ज्या नगराध्यक्ष व नगरसेवकांना निवडून दिले त्यांना खेळण्यातले बाहुले बनवून ठेवले असून त्याची चावी मात्र आपल्याकडे ठेवली आहे,जेवढी चावी भरली तेवढेच ते चालतात.म्हणजे पालिका हातळण्यास सक्षम ते नाहीत का?जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींना बाहुले बनवून ठेवणे हा लोकशाहीचा सत्यानाश असून नगराध्यक्षानाही कुणाचे बाहुले बनणे शोभत नाही असा सल्लाही आमदार अनिलदादा पाटील यांनी दिला आहे.

### २०० कोटींची नवीन पाणीपुरवठा योजनाही थंडबस्त्यात

अमळनेरकरांची पुढील ५० ते ६० वर्षाची पाण्याची सोय व्हावी म्हणून २०० कोटींची २४ बाय ७ योजना मी धरणावरून मंजूर करून प्रत्यक्षात त्याचे काम देखील सुरू केले,शहरभर त्याचे पाईप टाकले जात आहे.मात्र स्वार्थ सोडला तर या शहरातील नागरिकांसोबत विशेष आस्था नसल्याने या नवीन पाणीपुरवठा योजनेचे कामही यांनी थंडबस्त्यात आणले आहे.मात्र मतदारसंघ व शहराचा पालक या नात्याने मी स्वतः या योजनेकडे लक्ष घालणार असून लवकरच या कामाला गती आलेली दिसेल.

## संपादकीय

# भाड्याची नाती आणि वृद्धांप्रती सरकारचे उत्तरदायित्व

आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या युगात मानवी संवेदना बोथट होत चालल्या आहेत की काय, असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. एकेकाळी कुटुंबवत्सल म्हणून ओळखल्या जाणाऱ्या आपल्या समाजात आता भाड्याने मुले मिळण्याची वेळ आली आहे, हे सामाजिक अध:पतनाचे द्योतक आहे. आपल्या आयुष्याची पुंजी आणि रक्ताचे पाणी करून ज्या मुलांचे भविष्य घडवले, तीच मुले आज आपल्या वृद्ध आई–वडिलांना परदेशातील सुबत्तेत किंवा करिअरच्या शर्यतीत विसरून गेली आहेत. या आत्मकेंद्रित मानसिकतेमुळे भारतीय समाजव्यवस्थेत एक मोठी पोकळी निर्माण झाली आहे.अनेक वृद्ध आज मोठ्या शहरांमधील आपल्या प्रशस्त घरांच्या भिंतींकडे हताशपणे पाहत दिवस काढत आहेत. ज्या मुलांसाठी त्यांनी ही घरे बांधली, ती मुले आज वर्षातून एकदा भेटायलाही वेळ काढू शकत नाहीत. भेट झालीच तरी त्यांच्याकडे पालकांसाठी वेळ नसतो. या एकटेपणाचा फायदा घेत आता कंपन्या पुढे सरसावल्या आहेत. श्रीमंत वृद्धांसाठी भाड्याने मुले पुरवण्याचे पॅकेजेस दिले जात आहेत. हे कर्मचारी वृद्धांसोबत पत्ते खेळतात, टीव्ही पाहतात, गप्पा मारतात आणि त्यांचा एकटेपणा दूर करण्याचा प्रयत्न करतात. ही सेवा ग्रामीण भागातही विस्तारत आहे, हे अधिक चिंताजनक आहे.

जरी हे तात्पुरते समाधान असले, तरी रक्ताच्या नात्याला अशा प्रकारे व्यावसायिक पर्यायाने बदलणे हे हृदयाला चटका लावणारे वास्तव आहे.जेव्हा वृद्धांचे उत्पन्नाचे स्रोत कमी होतात आणि शरीर साथ देत नाही, तेव्हा परिस्थिती अधिक बिकट होते. विशेषत: खासगी क्षेत्रातील निवृत्त कर्मचारी, ज्यांना तुटपुंजी पेन्शन मिळते, त्यांच्यासाठी तर जगणे एक संघर्ष बनले आहे. आपण विकसित देशांचे उदाहरण पाहिले, तर तिथे नागरिक नोकरीच्या काळात जो आयकर भरतात, त्या बदल्यात सरकार त्यांच्या वृद्धापकाळातील आरोग्य आणि देखभालीची संपूर्ण जबाबदारी घेते.भारतात मात्र परिस्थिती उलट आहे. मोठ्या प्रमाणावर आयकर गोळा करूनही, सरकार वृद्धांना त्यांच्या हक्काच्या सोयीसुविधा पुरवण्यात अपयशी ठरत आहे. जोपर्यंत वृद्धांकडे स्वत:ची बचत आहे, तोपर्यंतच समाज आणि व्यवस्था त्यांना किंमत देते. वैद्यकीय उपचारांचा वाढता खर्च आणि कमी होणारे व्याजदर यामुळे त्यांच्या मनात भविष्याबद्दल मोठी भीती निर्माण झाली आहे. तथाकथित कल्याणकारी सरकारांनी आता केवळ घोषणाबाजी न करता, वृद्धांच्या सुरक्षेसाठी ठोस पावले उचलणे गरजेचे आहे.केवळ सरकारवर अवलंबून राहून चालणार नाही, तर वृद्धांनीही जीवनाचे वास्तव स्वीकारून मानसिकरीत्या खंबीर होणे आवश्यक आहे.

योग, प्राणायाम, ध्यानधारणा आणि सत्संग या माध्यमातून ते आपले उर्वरित आयुष्य शांततेत व्यतीत करू शकतात. शारीरिक हालचाल आणि सामाजिक कार्यात स्वत:ला गुंतवून घेतल्यास एकटेपणाची तीव्रता कमी होऊ शकते.सोशल मीडियावर अनेकदा एक सकारात्मक उपाय चर्चिला जातो.अनाथाश्रमातील मुले आणि वृद्धाश्रमातील वृद्ध यांना एकत्र आणणे. जर हे दोन्ही घटक एकत्र आले, तर अनाथांना आजी–आजोबांचे प्रेम मिळेल आणि वृद्धांना नातवंडांचा सहवास. यामुळे दोन्ही पिढ्यांमधील भावनिक पोकळी भरून निघू शकते. ही संकल्पना शासकीय स्तरावर राबवल्यास समाजातील दोन मोठ्या समस्यांवर एकाच वेळी उपाय शोधता येईल.वृद्धाश्रम हे लाचारीचे केंद्र न राहता ते सुसज्ज आणि सन्मानाने जगण्याचे ठिकाण बनले पाहिजे. यासाठी शासकीय स्तरावर मोठ्या निधीची आणि नियोजनाची गरज आहे. मात्र, या सगळ्यापेक्षा महत्त्वाची आहे ती जाणीव. ज्या आई–वडिलांनी आपल्याला चालायला शिकवले, त्यांना त्यांच्या आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यात वाऱ्यावर सोडणे हा मोठा नैतिक गुन्हा आहे. सरकारने वृद्धांसाठी कल्याणकारी योजना राबवाव्यातच, पण समाजानेही आपल्या संस्कारांची पुंजी पुन्हा एकदा तपासावी लागेल. भाड्याची मुले हे तात्पुरते मलम असू शकते, पण रक्ताच्या नात्यांमधील ओलावा हीच खरी गरज आहे.

# मानवतेच्या सेवेसाठी समर्पित एक महान चळवळ

## जागतिक रेड क्रॉस दिन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

जागतिक रेड क्रॉस दिन हा केवळ एक दिवस नसून तो मानवतेचा उत्सव आहे. संकटात सापडलेल्या जीवांना मदतीचा हात देणे आणि कोणत्याही भेदभावाशिवाय सेवा करणे, हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे.सर्वांचे भले व्हावे आणि कोणीही मदतीशिवाय राहू नये या उदात्त हेतूने जगभरात कार्यरत असणारी संस्था म्हणजे रेड क्रॉस. दरवर्षी ८ मे रोजी जगभरात जागतिक रेड क्रॉस दिन मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. हा दिवस रेड क्रॉस चळवळीचे संस्थापक जीन हेन्री ड्युनंट यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी समर्पित आहे.रेड क्रॉस संस्थेची स्थापना एका भीषण युद्धाच्या पार्श्वभूमीवर झाली. १८५९ मध्ये इटलीतील सोल्फेरिनोच्या युद्धात जखमी झालेल्या हजारो सैनिकांची दुरावस्था पाहून हेन्री ड्युनंट यांचे हृदय हेलावले. त्यांनी स्थानिक लोकांच्या मदतीने कोणत्याही पक्षाचा भेदभाव न करता जखमींवर उपचार केले.



या अनुभवातूनच १८६३ मध्ये इंटरनॅशनल कमिटी ऑफ द रेड क्रॉस ची स्थापना झाली. हेन्री ड्युनंट यांना त्यांच्या या महान कार्यासाठी जगातील पहिले नोबेल शांतता पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले.८ मे हा दिवस केवळ ड्युनंट यांचा वाढदिवस नाही, तर तो जगभरातील लाखो स्वयंसेवकांच्या धैर्याला सलाम करण्याचा दिवस आहे. युद्ध असो, नैसर्गिक आपत्ती असो किंवा महामारी, रेड क्रॉसचे स्वयंसेवक नेहमीच आघाडीवर असतात. हा दिवस आपल्याला आठवण करून देतो की, संकट कितीही मोठे असले तरी मानवी एकता आणि सेवाभाव त्यावर मात करू शकतो.

रेड क्रॉसची सात मूलभूत तत्त्वे आहेत. रेड क्रॉसची सर्व कामे सात स्तंभांवर आधारित आहेत.मानवी दु:ख दूर करणे आणि जीव वाचवणे.जात, धर्म, राष्ट्र किंवा राजकीय विचारांचा भेदभाव न करता मदत करणे.युद्धाच्या काळात कोणत्याही एका पक्षाची बाजू न घेणे.स्वायत्तपणे कार्य करणे.कोणत्याही फायद्याची अपेक्षा न ठेवता सेवा करणे.एका देशात एकच रेड क्रॉस संस्था असणे. जगभरातील सर्व शाखांनी एकमेकांना सहकार्य करणे.रेड क्रॉस केवळ युद्धकाळातच नाही, तर शांततेच्या काळातही अनेक महत्त्वाची कामे करते.पूर, भूकंप, चक्रीवादळ यांसारख्या नैसर्गिक आपत्तीत तातडीने मदत पोहोचवणे. सुरक्षित रक्ताचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी जगभरात मोठ्या प्रमाणात रक्तदान शिबिरे आयोजित करणे.प्राथमिक उपचार, लसीकरण आणि रोगराई प्रतिबंधासाठी कार्य करणे.युद्धातील कैद्यांची विचारपूस करणे आणि विखुरलेल्या कुटुंबांना पुन्हा एकत्र आणणे.

रेड क्रॉस ही जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी संघटना आहे. जेव्हा संपूर्ण जग घराबाहेर पडायला घाबरते (उदा. कोविड–१९ महामारी), तेव्हा हे पांढऱ्या कपड्यांवरील लाल चिन्हाचे दूत रस्त्यावर उतरून अन्न, औषधे आणि आधार देत असतात. त्यांचे नि:स्वार्थी कार्य हेच या संस्थेचा खरा कणा आहे.आजचे जग हे युद्ध, हवामान बदल आणि आरोग्यविषयक आव्हानांनी वेढलेले आहे. अशा काळात रेड क्रॉसच्या तत्त्वांची गरज पूर्वीपेक्षा जास्त आहे. जग बदलण्याची ताकद आपल्या सर्वांमध्ये आहे, हे या चळवळीने सिद्ध केले आहे.जागतिक रेड क्रॉस दिन हा आपल्याला माणुसकीची आठवण करून देणारा दिवस आहे. आपण सर्वांनी किमान एक स्वयंसेवक म्हणून किंवा रक्तदाता म्हणून या चळवळीत सहभागी व्हायला हवे. जेव्हा आपण दुसऱ्याच्या डोळ्यांतील अश्रू पुसतो, तेव्हाच खऱ्या अर्थाने या दिवसाचा उद्देश सफल होतो.मानवतेची सेवा, हीच खरी ईश्वर सेवा!

# ६७ हजार हेक्टरवर पेरणी होणार

## खरीप हंगामासाठी अमळनेर कृषी विभाग सज्ज

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर तालुक्यातील कृषी विभागाने सर्वंकष तयारी केली आहे. यंदा सुमारे ६७ हजार २३ हेक्टर क्षेत्रावर लागवडीचे नियोजन असून, विविध पिकांसाठी आवश्यक बियाणे व खतांचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. कापूस, मका, तूर, उडीद मूग, सोयाबीन, ज्वारी, बाजरी पिकांची लागवड केली जाते. बियाण्यांची मागणी लक्षात घेऊन विशेषत: बीटी कापसाच्या सुमारे १ लाख ८० हजार पॅकेट्सची मागणी नोंदविली आहे. त्यानुसार उपलब्धता सुनिश्चित करण्याचे काम सुरू आहे.

**बीज बदल प्रमाण वाढविण्याचे केले आहे आवाहन**

खतांच्या बाबतीतही प्रशासनाने २३ हजार ७०५ मेट्रिक टन खतांचे नियोजन केले आहे. यामध्ये युरिया, डीएपी, एसएसपी यांसारखी खते पुरेशा प्रमाणात उपलब्ध राहतील, याची खबरदारी घेण्यात आली आहे. शेतकऱ्यांनी माती परीक्षणानुसार संतुलित खतांचा वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

दरम्यान, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. बीजप्रक्रिया, पीक संरक्षण, पेरणीपूर्व तयारी, जमिनीची मशागत व पाणी व्यवस्थापन याबाबत कृषी सहाय्यकांकडून माहिती दिली जात आहे. तसेच बीज बदल प्रमाण वाढविणे, सेंद्रिय शेतीला प्रोत्साहन, आंतरपीक पद्धतीचा अवलंब करण्यावर भर देण्यात येत आहे. विशेषत: कपाशीमध्ये उडीद, मूग, सोयाबीन, तूर यांची आंतरपीक लागवड करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

### तालुक्यात बियाणे आणि खतांचा पुरेसा आहे साठा

पावसाच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर बीबीएफ पद्धतीचा वापर केल्यास जास्त किंवा कमी पावसामुळे होणारे नुकसान कमी होऊ शकते, असेही तज्ज्ञांनी सांगितले आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविण्यावरही विभागाचा भर आहे. येत्या खरीप हंगामासाठी सर्व आवश्यक नियोजन पूर्ण करण्यात आले असून शेतकऱ्यांना वेळेत बियाणे व खते उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासन सज्ज आहे. कृषी विभागाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन करताना तालुका कृषी अधिकारी सी. जे. ठाकरे यांनी सांगितले.





# मांडळच्या सुनेची सुरतमध्ये नगरसेवकपदी विजयी भरारी

**अमळनेर :** तालुक्यातील मांडळ येथील सून तथा भाजपच्या उमेदवार सुषमा युवराज पाटील या सुरत महानगरपालिकेच्या वॉर्ड क्रमांक २५ मधून नगरसेवकपदी भव्य मतांनी विजयी झाल्या आहेत. त्यांच्या विजयामुळे अमळनेर तालुक्यासह मांडळ गावात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

केंद्रीय जलशक्ती मंत्री सी. आर. पाटील तसेच लिंबायत विधानसभा मतदारसंघाच्या आमदार संगीता ताई पाटील यांच्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे सुषमा पाटील यांना मोठे पाठबळ मिळाले. सुषमा पाटील या २०१२ पासून भाजपमध्ये सक्रियपणे कार्यरत आहेत.

# शेतकरी पॅनलच्या माध्यमातून काँग्रेस मैदानात

**पान १ वरून**

वास्तव परिस्थिती उपस्थितां समोर मांडली.निवडणुकीत खर्च अनिवार्य असल्याने निवडणूक एकदिलाने व निष्ठेने लढविण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. मतदार यादीतील मयत मतदारांची संख्या अधिक असल्याने बोगस मतदानावर लक्ष ठेवणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. तसेच संबंधित भागातीलच पोलिंग एजंट नियुक्त करणे, मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभारणे आदी मुद्द्यांवरही सविस्तर चर्चा झाली. चर्चेनंतर काँग्रेस पक्षाच्या पॅनलला शेतकरी पॅनल हे नाव देण्याचा एकमताने निर्णय घेण्यात आला. प्रचारासाठी कमी कालावधी उपलब्ध असल्याने दि. ११ मे रोजी अमळनेर येथील विजय मारुती मंदिरात नारळ वाढवून प्रचाराचा शुभारंभ करण्याचे ठरविण्यात आले.पॅनल तयार करणे सुलभ व्हावे यासाठी उपस्थित इच्छुकांनी स्वखुशीने माघारीचे अर्ज सहीनिशी सुकाणू समितीकडे सुपूर्त केले. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीकडून नियुक्त तालुका सेवादल अध्यक्ष बन्सीलाल भागवत आणि शहर सेवादल अध्यक्ष भिकाजी रामचंद्र पाटील यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीस प्रताप पाटील, मनोज पाटील, प्रा. विश्वनाथ ठाकरे, त्र्यंबक पाटील, सुरेश कदम, प्रवीण जैन, रोहिदास पाटील, छोटू नाना आणि भिवसन पाटील यांची उपस्थिती होती. खेळीमेळीच्या आणि उत्साही वातावरणात भारतीय राष्ट्रीय काँग्रेस जिंदाबाद, अमळनेर काँग्रेस जिंदाबादच्या घोषणांनी सायंकाळी ७ वाजता बैठकीची सांगता झाली. सूत्रसंचालन प्रा. शाम पवार यांनी केले.

# अमळनेरमध्ये बजरंग दलाचा पाणी कुंडे उपक्रमाने तहानलेल्या मुक्या जीवांना दिलासा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



*अमळनेर : तहानलेल्या मुक्या जीवांना पाण्याचे कुंडांची उभरणी करण्याचा उपक्रम राबवितांना बजरंग दलाचे कार्यकर्ते व पदाधिकारी.*

अमळनेर : उन्हाळ्याची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असताना शहरातील भटक्या जनावरांपुढे पिण्याच्या पाण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. ही गरज लक्षात घेऊन विश्व हिंदू परिषद बजरंग दल अमळनेर यांच्या वतीने शहरात सिमेंटच्या पाण्याच्या कुंड्यांची उभारणी करण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला आहे, अशी माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

पदाधिकाऱ्यांनी सांगितले की, या उपक्रमांतर्गत शहरातील प्रमुख चौक, रस्ते तसेच मोकळ्या जागांमध्ये पाण्याने भरलेली कुंडे ठेवण्यात आली आहेत. त्यामुळे उन्हाच्या झळा सहन करणाऱ्या मुक्या पशु व गोवंशांना सहज पिण्याचे पाणी उपलब्ध होत असून, या उपक्रमाचे नागरिकांकडून स्वागत होत आहे. विशेष म्हणजे, संघटनेच्या कार्यकर्त्यांनी स्वतः पुढाकार घेत कुंड्यांमध्ये नियमित पाणी भरण्याची जबाबदारी स्वीकारली आहे. यासोबतच शहरातील नागरिकांनीही या उपक्रमात सहभागी होऊन



कुंड्यांमध्ये पाणी भरून मुक्या जीवांची तहान भागवावी, असे आवाहन करण्यात आले आहे. या उपक्रमातून सामाजिक बांधिलकी जपत मानवतेचा संदेश देण्यात आला असून, शहरात सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे चित्र दिसून येत आहे. यासाठी प्रखंड अध्यक्ष डॉ. संजय शाह, प्रखंड मंत्री सचिन चौधरी, प्रखंड संयोजक सचिन महाजन व इतर कार्यकर्ते उपस्थित होते. यांचे सहकार्य मिळत आहे.

# भरधाव ट्रॅक्टरच्या धडकेत दहावीतील विद्यार्थ्याचा मृत्यू

## बकरीसाठी औषध घेऊन परतताना हेडावेजवळ अपघात; ढेकू गावावर शोककळा

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : औषध घेऊन मोटरसायकलवरून घरी परतणाऱ्या ढेकू येथील दहावीतील विद्यार्थ्याचा भरधाव ट्रॅक्टरच्या धडकेत जागीच मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना मंगळवार, दिनांक ६ रोजी रात्री हेडावे गावाजवळ घडली. या अपघातामुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून ढेकू गावावर शोककळा पसरली आहे.




याबाबत मिळालेल्या अधिक माहितीनुसार, संचित राजेंद्र पाटील (वय १५) हा ढेकू येथील रहिवासी असून तो इयत्ता दहावीत शिक्षण घेत होता. त्यांच्या घरातील बकरीला कुत्र्याने चावा घेतल्याने तिच्यासाठी औषध आणण्यासाठी संचित मोटरसायकल (क्रमांक एमएच–१९–सीव्ही–९३३३ ) वरून अमळनेर येथे आला होता. औषध घेऊन तो परत गावाकडे जात असताना हेडावे गावाजवळ समोरून भरधाव वेगाने येणाऱ्या ट्रॅक्टरने त्याच्या मोटरसायकलला जोरदार धडक दिली. या भीषण अपघातात संचितच्या डोक्याला गंभीर मार लागल्याने त्याचा घटनास्थळीच मृत्यू झाला. अपघात इतका भीषण होता की परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनेची माहिती मिळताच पोलीस उपनिरीक्षक भगवान शिरसाठ, पोलीस कर्मचारी उदय बोरसे, सुनील पाटील, हेडकॉन्स्टेबल कुमावत व यश सपकाळे यांनी घटनास्थळी भेट देत पंचनामा केला. अपघातग्रस्त ट्रॅक्टर पोलिसांनी ताब्यात घेत पोलीस ठाण्यात जमा केले आहे. दरम्यान, अल्पवयीन विद्यार्थ्याच्या दुर्दैवी मृत्यूमुळे हेडावे व ढेकू परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

# मुंदडा ग्लोबल स्कूलच्या एनसीसी कॅडेट्सची शिबिरात चमक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील श्री एन. टी. मुंदडा ग्लोबल स्कूलच्या एनसीसी कॅडेट्सनी दोंडाईचा येथील नूतन माध्यमिक विद्यालयात आयोजित १० दिवसीय प्रशिक्षण शिबिरात उल्लेखनीय कामगिरी करत विविध स्पर्धांमध्ये पदके पटकावत आपली गुणवत्ता सिद्ध केली.मुलींसाठी १६ ते २५ एप्रिल २०२६ दरम्यान ज्युनियर विंग, तर मुलांसाठी २६ एप्रिल ते ५ मे २०२६ दरम्यान ज्युनियर डिव्हिजन शिबिर पार पडले. या शिबिरात शाळेच्या १९ मुली व २७ मुलांनी उत्साहाने सहभाग नोंदवला.

शिबिरात आर्मीच्या पीआय स्टाफमार्फत कॅडेट्सना रायफल हाताळणी व फायरिंग, नकाशा वाचन, फील्ड क्राफ्ट अँड बॅटल क्राफ्ट यांसह विविध विषयांवर सखोल प्रशिक्षण देण्यात आले. तसेच पोलिस अधिकाऱ्यांनी वाहतूक नियम, सायबर गुन्हे व मुलींची सुरक्षितता याबाबत मार्गदर्शन केले. शासकीय वैद्यकीय अधिकाऱ्यांनी आरोग्य तपासणी करून आवश्यक सूचना दिल्या. एनसीसी एएनओ अधिकाऱ्यांनी व्यक्तिमत्व विकास, वैयक्तिक स्वच्छता, नेट बँकिंग, यूपीआय व्यवहार आणि ऑनलाइन फसवणूक यांसारख्या विषयांवर मार्गदर्शन केले. शिबिरादरम्यान घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांमध्ये मुंदडा स्कूलच्या कॅडेट्सनी चमकदार कामगिरी केली. संस्कृती पाटील हिने स्वसंरक्षण या विषयावर प्रभावी भाषण सादर करून छत्रपती संभाजीनगर गट कमांडर ब्रिगेडियर अनुप बरबरे यांच्या हस्ते पदक व सन्मानचिन्ह मिळवले. 'विकसित भारत २०४७' या विषयावरील उत्कृष्ट भाषणासाठी प्राक्तन पाटील व ज्ञानेश पाटील यांना ४९ महाराष्ट्र बटालियनचे कमांडिंग ऑफिसर कर्नल अमित रे यांच्या हस्ते रौप्य पदक प्रदान करण्यात आले.

व्हॉलीबॉल स्पर्धेत आयुष बागुल, निखिल साळुंखे, पृथ्वीराज पाटील, करण पाटील, मोहित पाटील आणि भार्गव दुसाने यांनी रौप्य पदक पटकावले. तसेच निमिषा अहिरराव व श्रद्धा लोहार यांना उत्कृष्ट सूत्रसंचालनासाठी सन्मानित करण्यात आले. या शिबिरात एएनओ पंकजराव पाटील यांनी मुलांना, तर सीटीओ सुलोचना महाले यांनी मुलींना सातत्याने मार्गदर्शन केले. संस्थेचे अध्यक्ष प्रकाश मुंदडा व छाया मुंदडा तसेच शाळेचे प्राचार्य लक्ष्मण सर व प्राचार्या विद्या लक्ष्मण यांनी सर्व यशस्वी कॅडेट्सचे कौतुक केले.




*अमळनेर : येथील श्री एन. टी. मुंदडा विद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धात यश मिळविल्यानंतर विद्यार्थी. त्यांच्या समवेत शिक्षक व प्रशिक्षक.*

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :– आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई–मेल : globalmahatej@gmail.com

# मसाला पान






## त्यांचे नाव मिसिंग लिंकला देण्याची मागणी का होतेय? वाचून अभिमान वाटेल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

मुंबई : एक असा माणूस ज्याने खऱ्या अर्थाने मुंबई-पुण्याला जोडले. एक असा माणूस ज्याने बक्षिसात मरण मागितले. एक असा माणूस ज्याने इंग्रजी जुलमी राजवटीला शर्मेने मान खाली घालायला भाग पाडले... अर्थातच ते व्यक्ती होते शिंग्रोबा धनगर... मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरील प्रवासाचा वेळ कमी करणाऱ्या महत्त्वाकांक्षी 'मिसिंग लिंक' प्रकल्पाला शिंग्रोबा धनगर यांचे नाव देण्याची मागणी होत आहे.

### मुंबई-पुणे मार्गाचे खरे शिल्पकार

सह्याद्रीच्या कडेकपाऱ्या आणि आडवाटांची खडान्खडा माहिती असणारा हा माणूस. आज 'मिसिंग लिंक' लोकांसाठी खुला झाला. जगातील सगळ्यात रुंद बोगदा म्हणून त्याची 'गीनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये नोंद झाली आहे. अभियांत्रिकीचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून या बोगद्याकडे पाहिले जाते आहे. पण हा मार्ग शोधण्याचे खरे श्रेय जाते ते शिंग्रोबा धनगर यांना. ते कसे? यासाठी आपल्याला इतिहासाची पाने जरा चाळावी लागतील.

### शिंग्रोबा कोण होते? त्यांनी मुंबई-पुणे मार्गाचा शोध कसा लावला? आणि बक्षीस म्हणून इंग्रजांनी त्यांची हत्या का केली?

वर्ष होते १८५०. भारतमातेच्या अंगावर पारतंत्र्याच्या बेड्या होत्या. इंग्रज आपल्या देशाला अक्षरशः ओरबाडत होते. देशातील धन, धान्य, मसाले आणि प्रत्येक मौल्यवान वस्तू लंडनला पाठवण्यासाठी त्यांना गरज होती ती वेगवान कनेक्टिव्हिटीची. याच गरजेपोटी १६ एप्रिल १८५३ रोजी देशात पहिली रेल्वे धावली- बोरीबंदर ते ठाणे.

### कित्येक गोरे तज्ज्ञ आले अन् डोके खाजवून परत गेले

इंग्रजांचे खरे टार्गेट होते ते थेट पुणे गाठणे. मात्र, मुंबई आणि पुण्याच्या मध्ये भिंतीसारखा उभा होता, आसमानाशी स्पर्धा करणारा राकट सह्याद्री. या सह्याद्रीच्या दुर्गम कडेकपाऱ्यांतून रेल्वेचा मार्ग काढायचा कसा? हे इंग्रजांसमोरचे सगळ्यात मोठे आव्हान आणि कोडे होते. अनेक समित्या नेमल्या गेल्या. कित्येक गोरे तज्ज्ञ आले, डोके खाजवून परतले. पण सह्याद्रीने कुणालाही वाट दिली नाही. इंग्रज अधिकारी जंग-जंग पछाडत होते, पण डोंगरवाटा काही सापडत नव्हत्या.

### शिंग्रोबा धनगर आणि इंग्रजांची भेट

त्या काळात बोरघाटाच्या कुशीत एक धनगर वस्ती होती आणि तेथे राहायचे शिंग्रोबा धनगर. शिंग्रोबा म्हणजे सह्याद्रीचा श्वास. मेंढरे चारणाऱ्या या माणसाला सह्याद्रीचा प्रत्येक खडक, प्रत्येक दरी आणि प्रत्येक आडवाट तोंडपाठ होती. इंग्रजांची ही रोजची पळापळ शिंग्रोबा लांबून बघत होते.

### शिंग्रोबांनी 'राजमार्ग' दाखवला

'रोज गोरी माणसे येतात, डोंगर मोजतात आणि हताश होऊन परत जातात,' हे शिंग्रोबांच्या कुतूहलाचा विषय ठरला. शेवटी राहवले नाही आणि शिंग्रोबांनी विचारले, की 'काही हरवले आहे का तुमचे? काय शोधताय एवढे?' हताश झालेल्या इंग्रजांनी त्यांना आपली अडचण सांगितली. 'आम्हाला मुंबई-पुण्याला जोडणारा रेल्वेचा मार्ग हवाय...' हे सांगताना त्या गोऱ्या अधिकाऱ्यांना स्वप्नातही वाटले नसेल की या डोंगराच्या राजाकडे त्याचे उत्तर दडले आहे. शिंग्रोबा हसले आणि म्हणाले- की 'चला माझ्या मागे, मी तुम्हाला मार्ग दाखवतो.'

### शिंग्रोबांच्या बुद्धिमत्तेने इंग्रज अक्षरशः थक्क झाले

काही वेळातच शिंग्रोबांनी इंग्रजांना तो मार्ग दाखवला, जो आज जगासाठी अभियांत्रिकीचा चमत्कार आहे. एका धनगराच्या अनुभवापुढे सातासमुद्रापारची विद्या थकली होती. शिंग्रोबांच्या अफाट बुद्धिमत्तेने इंग्रज अक्षरशः थक्क झाले. सह्याद्रीचे जे कोडे भल्याभल्या इंजिनिअर्सना सुटले नव्हते, ते एका सामान्य धनगराने एका क्षणात सोडवले.

### स्वाभिमान आणि बलिदानाची गोष्ट

कमालीचे खूश झालेले गोरे अधिकारी शिंग्रोबांना म्हणाले, की 'माग काय मागायचे तुला? पैसा, जमीन की जहागिरी?' ती वेळ अशी होती की शिंग्रोबांनी सोन्याची वीट जरी मागितली असती, तरी इंग्रजांनी त्यांच्या पायाशी ठेवली असती. पण शिंग्रोबांचा पिंड हा स्वार्थाचा नव्हता, स्वाभिमानाचा होता. आपल्या मातीला ओरबाडणारे, आपल्याच भावंडांवर अत्याचार करणारे हे परकीय इंग्रज शिंग्रोबांनाही बोचत होते.

शिंग्रोबा शांतपणे म्हणाले, की 'साहेब, द्यायचंच असेल तर माझ्या देशाला स्वातंत्र्य द्या.' हे शब्द म्हणजे साक्षात ठिणगी होती. एका मेंढपाळाने सातासमुद्रापारच्या सत्तेला जाब विचारणे, हे इंग्रजांच्या अहंकाराला लागलेले शिसे होते. त्यांची तळपायाची आग मस्तकात गेली. ज्या माणसाने त्यांना मार्ग दाखवला, ज्याच्यामुळे त्यांचा रेल्वेचा रस्ता सोपा झाला, त्या शिंग्रोबांवर कृतघ्न इंग्रजांनी गोळ्या झाडल्या. सह्याद्रीच्या कुशीत शिंग्रोबांचे रक्त सांडले, पण त्या बलिदानाने हा घाट अमर झाला.

### शिंग्रोबांचे स्मारक मिसिंग लिंकला नाव देण्याची मागणी

शिंग्रोबांनी जेथे प्राणाची आहुती दिली तेथेच आज त्यांचे एक छोटेसे श्रद्धेचे देऊळ उभे आहे. आजही जुन्या मुंबई-पुणे महामार्गावरच्या बोरघाटात प्रवासी या वाटाड्या हुतात्म्यापुढे नतमस्तक होऊन त्याचे दर्शन घेतात. आज मुंबई-पुणे एक्स्प्रेसवेवरचा 'मिसिंग लिंक' लोकांसाठी खुला झाला आहे. त्याला शिंग्रोबांचे नाव द्यावे, अशी मागणी जोर धरत आहे. सरकार काय निर्णय घेईल तो घेईल. पण शिंग्रोबांमुळे आज मुंबई उर्वरित महाराष्ट्राशी जोडली गेली, हे त्रिकालबाधित सत्य आहे.

---

**पश्चिम बंगाल**

## 'शपथ ग्रहण के लिए नहीं है अच्छी साडी...'

### कालिता मांझी की सफलता सबसे प्रेरणादायक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

एक साधारण घरेलू नौकरानी से भाजपा की विधायक बनने वाली कलिता ने गरीबी, संघर्ष और सामाजिक रुकावटों को पार करते हुए न केवल चुनाव जीता बल्कि लाखों महिलाओं के लिए उम्मीद की किरण बन गईं। २००६ में एक प्लंबर से शादी के बाद कलिता मांझी गुस्कारा में दो घरों में काम करती रहीं। महीने के ४५०० रुपये कमाकर परिवार चलाती थीं। घर-गृहस्थी, बच्चों की देखभाल और पार्टी के काम के बीच संतुलन बनाना आसान नहीं था। फिर भी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी के भाषणों से प्रेरित होकर वे भाजपा की हर रैलियों में शामिल होती रहीं।



चुनाव जीतने के बाद सोमवार देर रात जब वे घर पहुंचीं तो कोई भव्य स्वागत या दावत नहीं थी। थकी-भूखी कलिता ने सास के हाथों बना आलू-पटोलर और झोल खाया। मंगलवार को वे सामान्य दिन की तरह कपड़े धोने और घरेलू कामों में लगी रहीं। विधायक बनने के बावजूद वे अपनी जड़ों को नहीं भूली हैं। न्यूज एजेंसी से बातचीत के दौरान उन्होंने कहा, 'मैं गरीबों, खासकर मेरी तरह की महिलाओं के लिए काम करना चाहती हूं।भाजपा महिलाओं और गरीबों का उत्थान करती है।' अभय कांड के विरोध में भी उन्होंने आवाज उठाई थी। नगर निगम या स्थानीय स्तर पर काम करते हुए कलिता ने लोगों के बीच अपनी अलग छवि बनाई।

कालिता आगे कहती हैं कि वह अपने पति और बेटे को कोलकाता में शपथ ग्रहण समारोह में ले जाने का प्लान कर रहीं हैं, लेकिन उनके पास इस मौके के लिए कोई सुंदर साड़ी नहीं है. मांझी की इस सादगी को देखते हुए उनके मालिक कृष्णा पात्रा ने उन्हें साड़ी उपहार में देने का फैसला किया है। कालिता मांझी ने श्यामा प्रसन्ना लोहार को १२,५३५ वोटों के अंतर से हराकर शानदार जीत दर्ज की। मांझी को १,०७,६९२ वोट मिले। उनकी यह जीत भाजपा के लिए व्यापक जनादेश के साथ आई है, जिसने राज्य में सत्ता पर कब्जा कर लिया है।


इस जीत ने राज्य में हो रहे बड़े राजनीतिक परिवर्तन के बीच भाजपा की जमीनी स्तर के उम्मीदवारों को प्रोत्साहन देने की रणनीति को मजबूती से रेखांकित किया है।

---

## भारत का इकलौता जिला जहां १७ नदियां बहती हैं

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारत को नदियों का देश कहा जाता है। क्योंकि देशभर में कई प्रमुख नदियां जैसे गंगा, यमुना, सिंधु और ब्रह्मपुत्र नदी शामिल है। लेकिन क्या आप जानते हैं कि ऐसा कौन भारत का ऐसा कौन सा जिला है जिसमें १७ नदियां बहती हैं।




### कहा जाता है नदियों की धरती

बता दें इस जिले को नदियों की धरती भी कहा जाता है। अगर आप भी नहीं जानते हैं कि इस जिले का क्या नाम है तो यहां जान लीजिए।

### कौन सा जिला

बता दें यहां हम आजमगढ़ जिले की बात कर रहे हैं। यहां छोटी बड़ी मिलाकर कुल १७ नदियां बहती हैं। जिसमें घाघरा और तमसा यहां की प्रमुख नदियां हैं।

### इस नदी को कहते हैं सरयू नदी

घाघरा नदी को सरयू नदी के नाम से भी जाना जाता है। जिले में घाघरा नदी जनपद के उत्तरी सीमा पर पश्चिम सीमा पर पश्चिम पूर्व की ओर लगभग ४५ किलोमीटर की लंबाई में बहती है।

### दूसरी प्रमुख नदी

यहां तमसा नदी जिले की दूसरी सबसे प्रमुख नदियों में से एक है। इसने आजमगढ़ जनपद को लगभग तीनों तरफ से घेर रखा है।

### यह प्रमुख नदियां

इसके अलावा मंजुषा, कुंदवर, बेसो, उदंती, मंगाई, भैंसही, लोनी, दोना, ओरा , बागड़ी , सुकसुई, कयाड़, एवं बागड़ी समेत कई नदियां बहती हैं। यही कारण है कि इसे नदियों की धरती कहा जाता है।

### प्रसिद्ध और ऐतिहासिक जिला

आजमगढ़ जिला उत्तर प्रदेश के पूर्वी हिस्से में स्थित एक प्रसिद्ध और ऐतिहासिक जिला है। इसकी स्थापना १६६५ में आजम खान ने की थी, जिनके नाम पर इसका नाम आजमगढ़ पड़ा।

---

## भारतातील स्पर्धांत पाकिस्तानचा सहभाग निश्चित

### केंद्रीय क्रीडा मंत्रालयाचा निर्णय, भविष्यातील मोठं प्लॅनिंग

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारतात होणाऱ्या बहुद्देशीय स्पर्धांत पाकिस्तानचे खेळाडू तसेच संघ सहभागी होतील, असे क्रीडा महासंघांना कळवतानाच भारतात येणाऱ्या खेळाडू, क्रीडा पदाधिकारी तसेच आंतरराष्ट्रीय क्रीडा महासंघाच्या प्रतिनिधींच्या भारत प्रवेशाची प्रक्रिया सोपी केल्याचेही सांगितले.

केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने दोन देशातील मालिका तसेच बहुद्देशीय स्पर्धांसाठी भिन्न धोरण असेल हे स्पष्ट केले. 'भारतीय संघ पाकिस्तानमध्ये कोणतीही मालिका खेळणार नाही किंवा पाकिस्तानच्या संघाला भारतातील मालिका खेळण्यासाठी मंजुरी देणार नाही. मात्र, त्याचवेळी आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांबाबतच्या नियमांचे पालन होईल,' असे सांगण्यात आले आहे. या नव्या सूचनेद्वारे पाकिस्तानचा सहभाग असलेल्या स्पर्धात भारत सहभागी होईल. तसेच भारतातील आंतरराष्ट्रीय स्पर्धांत पाकिस्तान सहभागी होऊ शकेल. या निर्णयामुळे भारतातील आंतरराष्ट्रीय स्पर्धेच्यावेळी पाकिस्तानच्या खेळाडूंना व्हिसा नाकारला जाणार नाही हेच त्यातून स्पष्ट करण्यात आले आहे. वर्ल्ड कप टी-२० स्पर्धेवेळी पाकिस्तानी वंशाच्या खेळाडूंना व्हिसा मिळण्यात प्रश्न आले होते. त्याची पुनरावृत्ती टाळण्याचेच संकेत देण्यात आले आहेत.

आंतरराष्ट्रीय स्पर्धेवेळी एखाद्या देशाच्या खेळाडूस अथवा संघास प्रवेश नाकारल्यास त्याचे दूरगामी परिणाम होतात. भारत प्रमुख क्रीडा स्पर्धांच्या आयोजनास उत्सुक आहे. ऑलिम्पिक तसेच आशियाई क्रीडा स्पर्धेच्या यजमानपदासाठी भारत उत्सुक आहे. त्यातील पाकिस्तानच्या सहभागावरून कोणीही प्रश्न उपस्थित करू नयेत हाच भारताचा प्रयत्न आहे.

केंद्रीय क्रीडा मंत्रालयाने दोन देशांतील मालिका तसेच बहुद्देशीय स्पर्धांसाठी भिन्न धोरण असेल हे स्पष्ट केले. नव्या सूचनेद्वारे पाकिस्तानचे खेळाडू अथवा संघांचा सहभाग असलेल्या स्पर्धांत भारताच्या संघांचा अथवा खेळाडूंच्या सहभागास परवानगी देण्यात येईल. या निर्णयामुळे भारतात होणाऱ्या कोणत्याही आंतरराष्ट्रीय स्पर्धेवेळी पाकिस्तानच्या संघास अथवा खेळाडूंना व्हिसा नाकारला जाणार नाही.

भारतात २०३० मध्ये राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा होणार आहे. भारत २०३६ च्या ऑलिम्पिक तसेच २०३८ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी उत्सुक आहे. त्याचबरोबर भारतात २०२९ मध्ये चॅम्पियन्स वन डे क्रिकेट स्पर्धा तसेच २०३१ मध्ये वर्ल्ड कप वन डे स्पर्धा होणार आहे. यंदा भारत आणि पाकिस्तानच्या खेळाडू जुलै-ऑगस्टमधील राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा तसेच सप्टेंबर-ऑक्टोबरमधील आशियाई क्रीडा स्पर्धेत सामने होतील. त्याशिवाय प्रो हॉकी लीगमध्ये दोन आणि वर्ल्ड कप हॉकीत भारत-पाक लढत होईल.

---

## रात्री ११ ते ३ दरम्यानची झोप महत्त्वाची का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

रात्री ११ ते ३ ही वेळ शरीराच्या अंतर्गत अवयवांच्या दुरुस्तीसाठी आणि पेशींच्या नूतनीकरणासाठी अत्यंत महत्त्वाची असते.

**यकृताचे कार्य**

आयुर्वेदानुसार आणि विज्ञानानुसार या काळात यकृत रक्तातील विषारी घटक बाहेर काढून शरीर शुद्ध करण्याचे (डेटोक्स) काम करते.

**गाढ झोप आणि मेंदू**

या चार तासांत आपल्याला 'डीप स्लीप' मिळते. जी मेंदूला शांत करण्यासाठी आणि स्मृती साठवण्यासाठी आवश्यक आहे.

**हार्मोनल संतुलन**

शरीरातील चयापचय क्रिया नियंत्रित करणारे हार्मोन्स या काळात संतुलित होतात. ज्यामुळे वजन वाढण्यावर नियंत्रण राहते.

**रोगप्रतिकार शक्ती**

जर तुम्ही या वेळेत जागे राहिलात, तर रोगप्रतिकार शक्ती कमकुवत होते आणि आजारी पडण्याची शक्यता वाढते.

**मानसिक आरोग्य**

रात्री उशिरापर्यंत जागल्याने चिडचिड, तणाव आणि नैराश्य यांसारख्या समस्या उद्भवू शकतात. योग्य वेळी झोपल्याने मन प्रसन्न राहते

**त्वचेचे सौंदर्य**

'ब्यूटी स्लीप' ही संकल्पना खरी आहे; या वेळेत झोपल्याने त्वचेवरील चमक कायम राहते आणि डोळ्यांखाली काळी वर्तुळे येत नाहीत.

**उर्जेचा स्त्रोत**

दुसऱ्या दिवशी उत्साही आणि कार्यक्षम राहण्यासाठी रात्री ११ ते ३ ची शांत झोप एखाद्या 'बॅटरी चार्जर'प्रमाणे काम करते.


---

## एक घर, तीन बहिणी अन् भन्नाट निकाल!

**सक्सेस स्टोरी**

### सख्ख्या बहिणींचे १२ वीच्या परिक्षेत 'असे'ही रेकॉर्ड

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने बारावीचा निकाल नुकताच जाहीर केला. या निकालात अनेक यशोगाथा समोर आल्या आहेत. मात्र, अहिल्यानगरमधील भाई सथ्था नाईट स्कूलच्या तीन सख्ख्या बहिणींच्या यशाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. प्रीती राजू अल्हाट, स्वाती राजू अल्हाट आणि अनिशा राजू अल्हाट अशी या बहिणींची नावे आहेत. या तिघींनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत एकाच वेळी बारावीची परीक्षा उत्तीर्ण केली आहे. त्यांच्या या यशाचे संपूर्ण जिल्ह्यात कौतूक होत आहे. या तिघींनीही संघर्ष करत यशाला गवसणी घातली आहे.

### दिवसभर कष्ट, रात्री अभ्यास

भाई सथ्था नाईट स्कूल हे प्रामुख्याने कष्टकरी आणि दिवसभर नोकरी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आशेचा किरण ठरले आहे. या शाळेतील प्रीती अल्हाट दिवसभर एका मेसमध्ये काम करून सायंकाळी शाळेत जात होत्या. त्यांची बहीण अनिशा अल्हाट गावाकडे शेतीकामात हातभार लावून वेळ मिळेल तेव्हा अभ्यास करत असे, तर स्वाती अल्हाट हिने घरची सर्व जबाबदारी सांभाळून परीक्षेची तयारी केली. अशा स्थितीत या तिन्ही बहिणी शिकल्या. एवढेच नव्हे तर त्यांनी आपले स्वप्नही साकार केले.

### बहिणीच्या हट्टामुळे मिळाले यश

या तिन्ही बहिणींच्या यशात प्रीती अल्हाट यांचा मोठा वाटा आहे. आपल्या दोन्ही धाकट्या बहिणींनी शिक्षण अर्धवट सोडू नये आणि त्यांनी किमान बारावीपर्यंत तरी शिकावे, यासाठी प्रीती यांनी हट्ट धरला होता. त्यांच्या याच जिद्दीमुळे आज तिघींनीही यशाची शिखरे सर केली आहेत. प्रीती यांनी नुसता हट्ट धरला नाही तर त्यांनीही बारावीची परीक्षा दिली. त्याही या परिक्षेत उत्तीर्ण झाल्या. आपल्याला मिळालेल्या यशाबद्दल या तिघींनीही आनंद व्यक्त केला आहे. शिवाय आणखी पुढे शिकण्याची इच्छाही त्यांनी व्यक्त केली आहे.

### पुढील शिक्षणाची जबाबदारी शाळेची

या तिघींच्या यशाचे कौतूक हिंद सेवा मंडळाचे माजी चेअरमन पारस कोठारी यांनी केले आहे. या भगिनींच्या संघर्षाची दखल घेऊन भाई सथ्था नाईट स्कूल त्यांच्या पुढील शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी उचलणार असल्याचे कोठारी यांनी जाहीर केले. विशेष म्हणजे या शाळेतून केवळ या तिघीच नव्हे, तर पती-पत्नी, सख्ख्या जावा आणि चुलत बहिणींनीही बारावीची परीक्षा यशस्वीरीत्या उत्तीर्ण केली आहे.

---

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे




# गुरु शुक्राचार्य महाराज मंदीर उर्जा स्थान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

महाराष्ट्रातील शिर्डी पासून १५ किलोमीटरवर असलेले कोपरगाव येथे गोदावरी नदीच्या किनारी गुरु शुक्राचार्य यांचे समाधी मंदिर आणि आश्रम परिसर आहे. या गुरू शुक्राचार्य मंदिरात शुभकार्य, विवाह करण्यास कोणताही मुहूर्त लागत नाही, असे हे जगातील एकमेव मंदिर आहे. अगदी सिंहस्थ काळ असला तरीही.

बेट कोपरगांव हे ब्रम्हदेव पुत्र महर्षी भृगु त्यांचे पुत्र व दैत्यांचे गुरु शुक्राचार्य उर्फ भार्गव यांचे हे कर्मस्थान असून त्यांनी तप व वास्तव्य केलेला हा परिसर आहे. त्यामुळे यास ऐतिहासिक तितकेच पौराणिकही महत्त्व प्राप्त झाले असून त्याची आख्यायिका अशी आहे. समुद्रमंथनातून देवांना अमृत मिळाल्यामुळे देवांना अमरत्व प्राप्त झाले. त्यामुळे दैत्य कुळांचा नाश हा निश्चित झाला. तो होऊ नये व दैत्य कुळ पुढेही चालू रहावे त्यासाठी दैत्यांनाही अमरत्व प्राप्तीसाठी पर्याय असणे जरुरीचे वाटल्याने दैत्यांचे गुरु शुक्राचार्य यांनी शंकराची अति घोर तपश्चर्या करुन गायत्री व महामृत्यूंजयापासून तयार झालेला संजीवनी मंत्र , ज्या योगे मृत झालेली व्यक्ती पुन्हा जिवंत होऊ शकेल असा मंत्र श्री शंकराकडून प्राप्त करुन घेतला व त्या मंत्राच्या आधारे ते मृत झालेल्या दैत्यांना पुन्हा जिवंत करुन देवांविरुध्द युध्दासाठी संजीवन करत असत. त्यामुळे दैत्यांचा संहार व नाश करणे हे देवांना क्रमप्राप्तच झाले. त्यासाठी देवांनी बृहस्पतीकडे जावून यावर उपाय विचारला असता बृहस्पतीनी देवांना असे सांगितले की, जर हा संजीवनी मंत्र लोप पावला तर या मंत्राचा काहीही प्रभाव चालणार नाही व गेलेले दैत्य पुन्हा जिवंत होऊ शकणार नाहीत. यासाठी शुक्राचार्यांकडून या मंत्राची दिक्षा घेणे अथवा मंत्र लोप करणे या शिवाय पर्याय राहिला नाही म्हणून सर्व देव व बृहस्पती या सर्वांनी हा संजीवनी मंत्र हस्तगत करण्यासाठी बृहस्पती पुत्र कच याची नेमणूक केली व त्यास गुरु शुक्राचार्य यांच्याकडे पाठविले. कच जेथे संजीवनी विद्या प्राप्तीसाठी आला ते हे स्थान असून शुक्राचार्य मंदीर हे गुरु शुक्राचार्याचे स्थान आहे. ते पूर्व गोदावरी नदीच्या पश्चिम तीरावर (ऐलतीरावर) होते व कच जेथे गुरु सेवेकरिता आला ते स्थान गोदावरीच्या पैलतीरावर होते. ते स्थान कचेश्वर मंदीर म्हणून प्रसिध्द असून ते शुक्लेश्वर मंदीराच्या उत्तर पूर्व बाजूस असून ते शुक्राचार्य व कचेश्वर यांचे एकत्रित पिंडीच्या स्वरुपात स्थापित आहे. गोदावरीच्या ऐलतीरावर गुरुचे स्थान व पैलतीरावर शिष्याचे स्थान आहे.

पूर्वीच्या नदीवरील घाट व त्याच्या खुणा अजूनही मंदीराच्या समोरील श्री विष्णू व गणपती मंदिराजवळ दिसून येतात. त्याच ठिकाणी गुरु शुक्राचार्य यांच्याकडून कच व देवयानी यांना हा संजीवनी मंत्र मिळविल्याचे संजीवनी पाराचे स्थान असून त्यात मंत्र मिळाल्यानंतर स्वर्गातील देवगण कचेश्वरावर पुष्पवृष्टी करण्यासाठी आले. त्यामुळे इतर देवांच्याही पिंडीच्या स्वरुपात प्रतिकात्मक मूर्ती आपणांस पहावयास मिळतात. हे स्थान अत्यंत जागरुक असून पावणारे आहे, अशी भक्तांची धारणा आहे. गुरुची सेवा करण्यासाठी सर्व



शिष्य कचासह रोज पैल तीरावरुन ऐलतिरावर म्हणजे हल्लीच्या शुक्लेश्वर मंदीराचे स्थानावर नित्यनियमाने येत असत. या शिष्यांना नदीच्या विशाल पात्रातून येण्या जाण्याचा त्रास होऊ नये म्हणून शुक्राचार्यांनी आपल्या हाताचा कोपर मारुन नदीचा प्रवाह बदलला. आज जो गोदावरी नदीचा प्रवाह आपणांस दिसत आहे तो बदलेला प्रवाह आहे. हाताच्या कोपराने नदीचा प्रवाह बदलल्यामुळे या भागास कोपरगांव असे नाव पडल्याची आख्यायिका आहे.


सर्व शिष्यांमध्ये कच हा अत्यंत भक्तिभावाने गुरुची सेवा करत असल्यामुळे सहाजिकच तो सर्व शिष्यांमध्ये गुरुचा लाडका शिष्य होता. ही गोष्ट इतर दानवांना सहन होत नसे. त्यामुळे कचावर दानवांची फार वाईट दृष्टी होती. द्वेषापोटी त्यांनी कचास दोन वेळा ठार मारुनही टाकले. गुरु शुक्राचार्यांना देवयानी नावाची एकुलती एक कन्या होती. तिचा कचावर जीव जडला होता. त्यामुळे तिने कचास दोन्ही वेळा वडिलांकडून संजीवनी मंत्राद्वारे जिवंत करुन घेतले. परिणामी सर्व दैत्य संतापले व त्यांनी कचाचा संपूर्ण नायनाट करण्याचे ठरविले. पुन्हा तिस-यांदा कचास ठार मारुन त्यांच्या शरीराची राख केली व ती राख आपले गुरु शुक्राचार्य यांना सोमरसातून प्राशन करविली. दैत्यांचे गुरु असल्यामुळे शुक्राचार्य हे सोमरस प्राशन करीत असत. त्याचा गैरफायदा घेवून दैत्यांनी डाव साधला. कच दिसेना म्हणून देवयानीने आपल्या वडिलांकडे कचासाठी पुन्हा हट्ट धरला. यावेळी अंतर्ज्ञानात गुरुंनी पाहिल्यानंतर त्यांच्या असे लक्षात आले की कच हा आपल्याच पोटात आहे. ही गोष्ट त्यांनी आपली लाडकी व एकुलती एक कन्या देवयानी हीस सांगून कचास जिवंत करणे अवघड असल्याचे सांगितले. तरी ही देवयानीने कसेही करुन कचास जिवंत करा हा आग्रह धरल्यामुळे शुक्राचार्यांनी देवयानीस सांगितले की जर कच जिवंत झाल्यास तो माझे पोट फाडून बाहेर येईल व मी मृत पावेल. त्यावर देवयानी हिने आपले वडील शुक्राचार्य यांना असे सुचविले की, आपण मला संजीवनी मंत्र शिकवावा त्या योगे मी तो मंत्र म्हणून आपणांस जिवंत करते. मुलीच्या हट्टाने व मद्य व्यसनामुळे जी गोष्ट घडून गेली, ती गेली गुरु शुक्राचार्यानी हा मंत्र आपली कन्या देवयानीस सांगितला (जपला). तो कचाने शुक्राचार्यांच्या पोटात असतांना ऐकला. कच जिवंत होऊन गुरुंचे पोट फोडून बाहेर आला. शुक्राचार्य मृत झाले. परंतु देवयानीने संजीवनी मंत्राने पुन्हा त्यांना जिवंत केले. ही घटना जेथे घडली तो संजीवनी पार या घटनेची मंदिरासमोर साक्ष देत आहे. संजीवनी मंत्र हा गुरु शुक्राचार्य, देवयानी व कचदेव यांनी ऐकल्यामुळे तो षट्कर्णी झाला व मंत्राचा लोप झाला. अशा त-हेने या मंत्राचा प्रभाव शिल्लक न राहिल्यामुळे दैत्यांना पुन्हा-पुन्हा जिवंत करण्याची शक्ती शुक्राचार्यांमध्ये राहिली नाही. देवांचे कार्य साध्य झाल्यामुळे मूळ देवलोकी जाण्यास कच निघाला, परंतू आश्रमात आल्यापासून देवयानीचे कचावर प्रेम जडल्यामुळे तिने त्यास लग्नासाठी याचना केली. आपण दोघेही एकाच वडिलाच्या उदरातून बाहेर आल्यामुळे आपले नाते हे गुरुबंधू व गुरु भगिनींचे झाल्यामुळे मी तुला वरु शकत नाही, असे सांगितले. या गोष्टीचा राग येवून वअपेक्षाभंगाच्या दुःखामुळे देवयानीने कचास शाप दिला की, तू जी विद्या प्राप्त करुन चाललास त्या विद्येचा तुला व कोणासही कधीही उपयोग होणार नाही, देवयानीची शापवाणी ऐकून आपण एवढे समजावून सांगत असताना देखील देवयानी ऐकत नाही व विवाहाचा हट्ट धरते आहे यावर क्रोधीत होऊन कचदेव हि देवयानीस शाप देतात की तुलाही या विद्येचा काहीही उपयोग होणार नाही व तू ब्राह्मण कन्या असूनही तुझा विवाह ब्राह्मणेतर व्यक्तिबरोबर होईल.

अशारितीने संजीवनी मंत्राचा प्रभाव एकमेकांना शापित केल्याने पूर्णपणे लोप पावतो व कचदेव हे देवलोकी निघून जातात. पुढे ही शापवाणी खरी ठरुन शुक्राचार्य कन्या देवयानी हिचा विवाह क्षात्रकुळातील ययाती राजाशी झाला. अशी ही पौराणिक कथा आहे. कच देवाने देवयानीस दिलेली शापवाणी पुढे खरी ठरते. एकदा वनविहारास गेली असताना असूर राजा वृषपर्वा यांची कन्या शर्मिष्ठा देवयानी एका छोट्याशा विहिरीत ढकलून देते. आपला जीव वाचविण्यासाठी धावा करित असताना तेथे शिकारीसाठी आलेले महापराक्रमी क्षत्रिय राजा ययाती आपला हात हातात देऊन देवयानीस वाचवितात. हात हातात घेतल्याने त्यांच्यावर पाणीग्रहण संस्कार होतात. (पाणिग्रहण संस्कार म्हणजे पूर्वीच्या काळी स्त्रीया कुठल्याही परपुरुषांच्या हातात आपला हात देत नसत. जर चुकूनहि हात हातात घेतला गेला तरि त्यांचे पाणिग्रहण संस्कार झाले म्हणजे विवाह झाला असे समजले जात असे.) पाणीग्रहण संस्कार झाल्यामुळे ब्राह्मण कन्या असूनही देवयानी हिस क्षत्रिय राजा ययाती यांच्या बरोबर विवाहबद्ध व्हावे लागले होते. पाणीग्रहण झाले त्यावेळी ग्रह, नक्षत्र अनुकूल नव्हते व सिंहस्थ काळ असल्यामुळे कुठलाहि शुभमुहूर्त निघत नव्हता. म्हणून गुरु शुक्राचार्य महाराजांनी आपल्या आश्रमात गोदातीरी विवाह सिद्ध होम करुन आपल्या तपोबलाने संपूर्ण परिसर पावन करुन ग्रह नक्षत्र अनुकूल करुन घेतले व या पावन भूमीस असे वरदान दिले की, यापुढे केव्हाही या भूमीत कोणतेही पवित्र कार्य (विवाह, इत्यादी शुभकार्य) करण्यास कुठलाही मुहूर्त, नक्षत्र, तिथी, वेळ व सिंहस्थकाळ पहावा लागणार नाही व येथे केलेले शुभकार्य हे विशेष यशस्वी होतील.

महर्षी शुक्राचार्य यांची मुलगी देवयानी ही कच देवाच्या शापामुळे क्षत्रिय राजा ययाती यांचेशी विवाहबद्ध झाली त्यांच्या पुढील झालेल्या यदु वंशात भगवान श्रीकृष्ण यांचा जन्म झाला तर राजा ययाती आणि त्यांची प्रथम पत्नी शर्मिष्ठा यांच्या पुढील वंशात पराक्रमी भीष्माचार्य, पांडव, कौरव यांचा जन्म झालेला आहे. आजही शुक्राचार्यांचे हे स्थान त्यांच्या तपोबलाने पुनीत झाल्यामुळे या भूमीवर जी-जी विवाह कार्ये होतात. त्यासाठी मुहूर्त, वेळ, नक्षत्र, तिथी यांचा कोणताही दोष लागत नाही. येथे केव्हाही विवाह होतात. या सर्व गोष्टींची साक्ष हा परिसर देत असून देवळाच्या ओव-या पूर्वी येथे असलेल्या पेशव्यांच्या वाडयाच्या अवशेषातून बांधलेल्या आहेत. तसेच समोर श्री विष्णू व गणपती यांची मंदिरे आहेत. श्री विष्णुचे मंदिर हे काळया गुळगुळीत दगडातून बांधलेले असून मंदिराच्या पायथ्याशी पूर्वी नदीचा घाट होता. त्याच्या खुणा व शिलालेख आजही बघावयास मिळतो. तसेच दोन्ही मंदिराच्या मध्यात संजीवनी पार म्हणजे येथे कचास संजीवनी विद्या प्राप्त झाली व कच आणि देवयानी यांनी एकमेकांस शापित केले. त्याचे हे स्थान असून याचे उत्तर पूर्वेस शुक्राचार्य शिष्य कचदेव यांचे गुरुसह मंदिर व ओव-या ( कचेश्वर मंदिर) असून त्या स्थळी संजीवनी मंत्र देते वेळी श्री शंकर भगवान (त्र्यंबकेश्वर) गुप्त रुपाने तेथे आल्यामुळे त्यांचेही श्री त्रिंबकेश्वर मंदिर आहे. श्री शंकर भगवान येथे गुप्त रुपाने आल्यामुळे सदर मंदिरासमोर नंदीची स्थापना झालेली नाही. कचेश्वर मंदिरात सेवा ( प्रदक्षिणा) घालण्याचा रिवाज आहे.

## नामस्मरणाने आचरणात खरोखर बदल होतो का?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



नामस्मरणाने आचरणात खरोखर बदल होतो का की फक्त मनाला दिलासा मिळतो, असा प्रश्न अनेकांना पडतो. जर नाम घेतोय तर त्याचा परिणाम आपल्या वागण्यात दिसायला हवा ना. सुरूवातीला कदाचित बाहेरून काही मोठा बदल जाणवत नाही, पण आतून एक सूक्ष्म परिवर्तन सुरू होते. विचार थोडे संयमी होतात, प्रतिक्रिया देण्याऐवजी थांबून पाहण्याची सवय लागते. राग पटकन येतोच, पण तो तितक्याच वेगाने शांतही होऊ लागतो. मग लक्षात येते, की नामस्मरण फक्त जप नाही, ते आपल्या आचरणाला आकार देत आहे.

मग प्रश्न उभा राहतो की जर बदल हळूहळू होत असेल, तर आपण तो कसा ओळखायचा. उत्तर सोपे आहे, की आपल्या दैनंदिन वागण्यात पाहायचे... पूर्वी ज्या गोष्टींवर लगेच चिडचिड व्हायची तेथे आता थोडा संयम दिसतो का, इतरांच्या चुका पाहून मनात द्वेष निर्माण होतो का, की समजूतदारपणा वाढतो. नामस्मरणाचा खरा परिणाम बाहेरच्या जगात नाही, तर आपल्या प्रतिक्रियांमध्ये दिसतो. जेथे मन आधी अस्थिर होत होते तेथे आता स्थिरतेचा फरक दिसायला लागतो.

पुढे एक महत्त्वाचा प्रश्न येतो, की नामस्मरण हे मागेल ते मिळविण्यासाठी करायचे का? जर नाम घेतले तर आपल्या इच्छा पूर्ण होतील का? हा विचार नैसर्गिक आहे. नामस्मरण हे इच्छा पूर्ण करण्यासाठी नाही, तर इच्छांवर नियंत्रण मिळविण्यासाठी आहे. कारण इच्छा पूर्ण झाली तरी नवी इच्छा उभी राहतेच. मग ही धावपळ कधी थांबणार. नामस्मरण आपल्याला त्या धावपळीपासून थोडे दूर उभ राहत आणि समज देते की खरे समाधान बाहेरच्या गोष्टींमध्ये नाही.

मग प्रश्न पडतो की जर काही मागायचच नसेल तर नामस्मरण का करायचे. कारण नामस्मरण आपल्याला बदलते. ते आपल्याला योग्य विचार देते, योग्य आचरण शिकवते आणि आतून समाधान देते. जेव्हा मन समाधानी होते तेव्हा बाहेरच्या गोष्टींची गरज कमी वाटते. आणि आश्चर्य म्हणजे जेव्हा आपण मागणे सोडतो तेव्हा जे आवश्यक आहे ते आपोआप मिळत जाते. शेवटी समजून घ्यायचे की नामस्मरण ही व्यवहार बदलणारी शक्ती आहे. ते आपल्याला शांत, संयमी आणि समजूतदार बनवते. मागण्यासाठी नव्हे, तर स्वतःला घडविण्यासाठी नामस्मरण करायचे. कारण जेव्हा आपण बदलतो, तेव्हा आपल्या आयुष्याचा मार्गही आपोआप बदलतो.

# श्री सत्यनारायण पूजा कोणी, कुठे व कधी करावी?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री सत्यनारायण पूजा ही पती-पत्नी यांनी जोडीने करावी. पुरुषांनी अगर मुलांनी केली तरी चालते. सत्यनारायण ही पूजा वर्षभरातील कोणत्याही दिवशी, कोणत्याही वेळेला केली तरी चालते. यास मुहूर्त पाहण्याची जरूरी नाही. तरीही पौर्णिमा, संक्रांत, श्रावण आणि अधिक (पुरुषोत्तम) मासातील पूजा विशेष समजली जाते. कोणतेही नवीन कार्य सुरू करताना पूजा करतात. संकल्प करताना पूजा करतात. पूजा शक्यतो गोरज मुहूर्तावर करावी. पूजा होईपर्यंत उपवास करावा.

प्रातःकाळी पूजा केल्यास उत्तम. पूजेला बसताना आपले मुख पूर्वेकडे करून पुजेला बसावे. दक्षिणेकडे मुख करून बसू नये. पूजा चालू असताना घरातील सर्व मंडळी, आप्तस्वकीय, मित्रमंडळी जर



जेथे पूजा चालू आहे तेथे थांबून मंत्र किंवा कथा ऐकतील तर यातून निर्माण होणाऱ्या या सात्त्विक लहरींचा त्यांना लाभ होऊन सत्यनारायणाचे पुण्य मिळेल. या पूजेची कलियुगात नितांत गरज आहे.

**पूजेला लागणारे साहित्य**

सत्यनारायणाचा फोटो, हळद, कुंकू, गुलाल, बुक्का प्रत्येकी ५० ग्रॅम. फुले, तुळशी (१०८ पाने) हार २, विड्याची पाने ५०, सुपाऱ्या २७, नारळ २, खारीक ५, बदाम ५ हळकुंड ५, खोबऱ्याचा तुकडा, गुळाचा खडा, खोबरे वाटी १, खडीसाखर (१०० ग्रॅम), जानवी जोड, १ मीटर कापडाचे दोन पीस, पंचामृत (दही, दूध, तूप, मध, साखर) सुवासिक उदबत्ती, कापूर, सुट्टी रुपयांची नाणी ७, समया २, निरांजन १, तांदूळ १ किलो, गहू २५० ग्रॅम, केळीचे किंवा कर्दळीचे खुंट ४, शंख, घंटा, बाळकृष्णाची मूर्ती किंवा शाळीग्राम, अत्तराची बाटली, केळी १ डझन, तांब्याचे गडवे ३, ताम्हण २, पाट ४, चौरंग १, वेगवेगळी ५ फळे.

**महाप्रसाद**

गव्हाचा रवा, साखर, साजूक तूप, प्रत्येकी सव्वाप्रमाणात सव्वापावशेर अथवा सव्वाकिलो प्रमाणात, पाव किलोपासून प्रसाद करावा. त्यावर सव्वाकेळी कुस्करून घालावीत. याशिवाय महानैवेद्यासाठी गोड स्वयंपाक करावा.

### पूजन प्रारंभ

सुहासिनीने हळद-कुंकू लावावे, यजमानांनी पूजेला बसल्यानंतर विडे घेऊन पळीत पाणी घ्यावे. विड्याच्या दोन पानांवर अक्षता, पैसा व सुपारी ठेवावी. आपल्या कुलदैवतासमोर विडा ठेवून त्यावर एक पळी पाणी सोडावे, देवाला नमस्कार करावा. घरातील थोर मंडळींना नमस्कार करावा, गुरुजींना नमस्कार करून आपापल्या आसनावर बसावे आणि पूजेला प्रारंभ करावा.

### सत्यनारायण पूजेची मांडणी

- स्वच्छ जागेवर शक्यतो पूर्व पश्चिम चौरंग मांडावा.
- त्याभोवती रांगोळी काढून त्यात गुलाल अथवा रंग भरावा.
- आवडीप्रमाणे रोषणाई करावी.चौरंगाला चारी बाजूंना केळीचे अथवा कर्दळीचे खुंट बांधावेत. चौरंगावर मागील बाजूस सत्यनारायणाचा फोटो उभा ठेवावा.
- चौरंगावर गहू किंवा तांदूळ पसरावेत, उजव्या बाजूला चौरंगावरच मुठभर तांदूळ ठेवून त्यावर गणपतीबाप्पांचे प्रतीक म्हणून पांढरी सुपारी ठेवावी. मधल्या तांदूळ किंवा गव्हावर पाण्याने भरलेला कलश ठेवावा. त्यात गंध, फुले, अक्षता, सुपारी, दुर्वा व एक नाणे, आंब्याचा डहाळा ठेवावा, त्यावर विड्याची ५ पाने ठेवावीत.
- कलशावर हळदी-कुंकवाचे पट्टे ओढावेत, छोटे स्वस्तीक चिन्ह काढावे. त्या कलशांवर ताम्हण ठेवावे. ताम्हणात तांदूळ किंवा गहू पूर्ण भरावेत. मध्यभागी एक सुपारी मांडावी. (वरुणाचे प्रतीक) आठ दिशांना आठ लोक पालांच्या सुपाऱ्या मांडाव्यात.
- लोकपाल येणेप्रमाणे- पूर्वेस इंद्र , पश्चिमेस वरुण, दक्षिणेस यम, उत्तरेस सोम, आग्नेयेस अग्नी, नैर्ऋत्येस- निश्वती, वायव्येस- वायू, ईशान्येस- इशान; त्याचप्रमाणे नवग्रहांच्या सुपाऱ्या मांडाव्यात.
- पूजेसाठी बाळकृष्ण अथवा शाळीग्राम घ्यावा. शाळीग्राम असेल तर अक्षता वाहू नयेत. तुळशीपत्र वहावे. बाळकृष्णाला अक्षता वहाव्यात. चौरंगावर डावीकडे पाच विडे मांडावेत. प्रत्येक विड्यावर एक हळकुंड आणि खारीक ठेवावे. डावीकडे समई ठेवावी. तांदळावर ठेवलेल्या सुपारी गणपतीबाप्पांमागे शंख ठेवावा.

## शुक्रवारी देवी लक्ष्मी प्रसन्नतेसाठी काय कराल?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

शुक्रवारी सकाळी आंघोळ वगैरे केल्यानंतर पांढरे वस्त्र परिधान करावे. यासोबतच देवी लक्ष्मींची विधिवत पूजा करून त्यांना कमळाचे फूल अर्पण करावे. कडुनिंबाच्या झाडाला पाणी अर्पण करावे. कडुनिंबाला माँ दुर्गेचे रूप मानले जाते. या कारणास्तव तिला 'निमारी देवी' असेही म्हणतात. यासोबतच ग्रह दोषांपासूनही आराम मिळतो. म्हणूनच शुक्रवारी सकाळी स्नान वगैरे केल्यानंतर कडुनिंबाच्या झाडाला जल अर्पण करावे.



**पांढऱ्या वस्तू दान करावयात**

शुक्रवारी माँ लक्ष्मींची पूजा करण्यासोबतच पांढऱ्या रंगाच्या वस्तू दान कराव्यात. कारण हा रंग देवी लक्ष्मींना अतिशय प्रिय आहे. म्हणूनच शुक्रवारी पांढरे वस्त्र, तांदूळ, मैदा, साखर, दूध, दही इत्यादींचे दान करावे.

**या मंत्रांचा जप करा**

शुक्रवारी भगवान शुक्राला प्रसन्न करण्यासाठी यापैकी कोणत्याही एका मंत्राचा सुमारे १०८ वेळा जप करावा. ओम शुं शुक्राय नमः या ओम हिमकुंडमृणालाभन दैत्यानान परम गुरु सर्वशास्त्र प्रवर्तकं भार्गवम् प्रणमायहन.

**साखरेचे द्रावण**

प्रत्येक कामात काही अडथळे येत असतील, तर माँ लक्ष्मींची पूजा करण्यासोबतच शुक्रवारी काळ्या मुंग्यांना साखर खाऊ घाला. याचा फायदाही तुम्हाला मिळेल.

## आयुष्यातील नैराश्य दूर करून यशस्वी व्हायचे?

### गरुडाचे 'हे' ७ गुण येतील कामी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

आयुष्यात नैराश्य आल्यास कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होणे अतिशय कठीण बनत असते.

सामर्थ्य, बुद्धिमत्तेचे प्रतीक हिंदू पौराणिक कथांनुसार गरुड हे भगवान विष्णूंचे वाहन असून ते सामर्थ्य आणि बुद्धिमत्तेचे प्रतीक आहेत.

**गुण**

यशस्वी जीवनासाठी आपण गरुडाकडून अनेक गुण घेऊ शकतो, ते कोणते हे आहेत ते जाणून घेऊया.

**मोठी स्वप्ने पाहा**

गरुड नेहमीच गगनात उंच भरारी घेतात. ते आपल्याला शिकवतात, की जीवनात नेहमी लहान नाहीत तर मोठी स्वप्ने पाहावीत.

**चुकीच्या गोष्टीचा विरोध**

आपल्या मातेची सुटका करण्यासाठी गरुडाने खुद्द देवांनाही आव्हान दिले. याचा अर्थ असा की, जर एखादी गोष्ट चुकीची वाटत असेल, तर घाबरू नका; त्याविरुद्ध आपला आवाज उठवा.

**ज्ञान प्राप्त करा**

गरुडाने वेदांचे ज्ञान संपादन केले. यावरून हे सिद्ध होते, की सामर्थ्य केवळ शरीरातून मिळत नाही, तर ते विद्येतूनही प्राप्त होते.

**आत्मसन्मान**

गरुडाने देवांची गुलामगिरी नाकारली, कारण त्याला आपल्या आत्मसन्मानाची विशेष चाड होती. जीवनात कधीही आपल्या आत्मसन्मानाशी तडजोड करू नका.

**निष्ठा**

आपल्या मातेच्या सुटकेसाठी त्यांनी कोणताही धोका पत्करण्याची तयारी दर्शवली. आपल्या कुटुंबाप्रती असलेली निष्ठाच खऱ्या अर्थाने एखाद्या व्यक्तीला महान बनवते.

**स्वनियंत्रण**

गरुडाकडे प्रचंड वेग आहे, तरीही ते आपली दिशा कधीच गमावत नाहीत. याचा अर्थ असा की, वेग आवश्यक असला तरी, त्यावर असलेला ताबा त्याहूनही अधिक महत्त्वाचा असतो.

**आत्मविश्वास**

गरुड हे भगवान विष्णूंचे वाहन बनले, कारण त्यांच्याकडे अढळ असा आत्मविश्वास होता. केवळ ज्यांचा स्वतःवर विश्वास असतो, तेच खऱ्या अर्थाने महानता प्राप्त करू शकतात.



(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)